**परिपत्रक**

क्र.विपोमनि/विसुवि/आ-१/ प्रतिनि-निवड-प्रक्रिया-२०२५(ऑनलाईन अर्ज)/२०२५/2205दि.03/06/२०२५

संदर्भ :- महाराष्ट्र शासन, गृहविभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.एसएसए-०५१८/ प्र.क्र. २२१/ विशा- ४, दि.१६/०८/२०१८

विषय :- विशेष सुरक्षा विभाग प्रतिनियुक्ती निवड प्रक्रिया - २०२५.

*********

उपरोक्त संदर्भाधीन विषयास अनुसरुन कळविण्यात येत आहे की, आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अधिपत्याखालील विशेष सुरक्षा विभागामधील पोलीस अधिकारी / अंमलदारांची रिक्त पदे ऑनलाईन निवड प्रक्रियेने भरण्याकरीता निवड प्रक्रिया - २०२५ राबविण्यात येत आहे. त्याकरीता ईच्छुक पोलीस अधिकारी (नि:शस्त्र पोलीस निरीक्षक, नि:शस्त्र सहा.पोलीस निरीक्षक व नि:शस्त्र पोलीस उप निरीक्षक ) / अंमलदार यांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरुन मागविण्यात येणार आहेत.

विसुवि प्रतिनियुक्तीकरीता ईच्छुक पोलीस अधिकारी / अंमलदार यांनी भरावयाचा ऑनलाईन अर्ज व जाहिरात **http://www.mahapolice.gov.in** या संकेतस्थळावर(वेब साईट)दि.04/06/2025 ते दि.03/06/2025 रोजीपर्यंत उपलब्ध राहील.

निवड प्रक्रिया - २०२५ करीताची जाहिरात माहितीकरीता सोबत जोडली असुन सर्व घटक प्रमुखांना कळविण्यात येत आहे की त्यांनी त्यांचे आस्थापनेवरील सर्व पोलीस अधिकारी / अंमलदार यांना जाहिरातीबाबत अवगत करावे.

( अंकुश शिंदे ) 03/06/25
विशेष पोलीस महानिरीक्षक ( व्ही.आय.पी.सुरक्षा)
विशेष सुरक्षा विभाग, दादर, मुंबई .

प्रति,

मा.पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह).
मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.राज्य,मुंबई (सस्नेह).
मा.पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके / लोहमार्ग म.राज्य, मुंबई. (सस्नेह).
मा.आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, म.राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक, आ.गु.शा, मुंबई / सायबर, मुंबई / वाहतुक मुंबई / द.वि.प.म.राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त ( लोहमार्ग मुंबई सह बृहन्मुंबई वगळून )
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक / महाराष्ट गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे.

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / नक्षल विरोधी अभियान, नागपूर / फोर्स वन, मुंबई /
मा.राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई / ना.ह.सं. म.राज्य, मुंबई.
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर.
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग / राज्य पोलीस नियंत्रण कक्ष, मुंबई सह)
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालये / युओटिसी, नागपूर / डि.टी.एस.नाशिक.
समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १३

प्रत योग्य त्या कार्यवाहीकरीता,
पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

# विशेष सुरक्षा विभागामध्ये प्रतिनियुक्तीकरीता ऑनलाईन निवड प्रक्रिया- २०२५

( नि:शस्त्र पोलीस निरीक्षक / नि:शस्त्र सहा.पोलीस निरीक्षक / नि:शस्त्र पोलीस उप निरीक्षक)

(पोलीस शिपाई / पोलीस नाईक / पोलीस हवालदार )

**जाहिरात** दिनांक :-३ /०६/२०२५

**सूचना / माहितीपत्रक**

**आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

संदर्भ :- महाराष्ट्र शासन गृह विभाग, शुध्दीपत्रक क्र.एसएसए-०५१८/प्र.क्र.२२१/विशा-४, दि.१६ ऑगस्ट २०१८

विषय :- विशेष सुरक्षा विभाग येथे प्रतिनियुक्तीबाबत.

********

राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई अंतर्गत विशेष सुरक्षा विभाग येथे संदर्भाधीन शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी धारण करीत असलेले महाराष्ट्र पोलीस दलातील इच्छुक पोलीस अधिकारी ( रा.रा.पो.बल वगळून )/ पोलीस अंमलदार( जिल्हा पोलीस दल व रा.रा.पो.बल सह ) यांचेकडून विशेष सुरक्षा विभागामधील रिक्त पदे प्रतिनियुक्तीने भरण्याकरीता ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहे.

याबाबतचा ऑनलाईन अर्ज http://www.mahapolice.gov.in/ या संकेतस्थळावर ( वेब साईट ) तसेच आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, जुने विधान भवन, दुसरा मजला, शहीद भगतसिंग रोड, कुलाबा, मुंबई - ४०० ००१ येथील नोटीस बोर्डवर उपलब्ध राहील. सदर अर्जाच्या अनुषंगाने पात्र पोलीस अधिकारी / अंमलदार यांचेकरीता निवड प्रक्रियेसाठी शारिरीक क्षमता चाचणी घेण्यात येणार आहे.

१ विशेष सुरक्षा विभागामध्ये प्रतिनियुक्तीने नेमणुकीसाठी अर्जदाराने एकदाच अर्ज सादर करावयाचा आहे. एकापेक्षा जास्त अर्जांचा विचार करण्यात येणार नाही. तसेच एकापेक्षा अधिक विसुवि घटकामध्ये सादर केलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

२ पोलीस अधिकारी / अंमलदारांनी ऑनलाईन अर्जामध्ये त्यांच्या पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपूर्ण, अचूक व खरी माहीती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहिल्यास व त्यामुळे निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवारांची राहील.

३ अर्जदाराने शारीरिक क्षमता चाचणीच्या वेळी त्यांचे ओळखपत्र व त्यांनी ऑनलाईन भरलेल्या अर्जाची छापिल ( Print ) प्रत सोबत घेवून येणे बंधनकारक असेल. अन्यथा उमेदवारांस शारिरीक क्षमता चाचणीसाठी प्रवेश दिला जाणार नाही.

४ निवड प्रक्रिये अंतर्गत घेण्यात येणा-या वैद्यकिय तपासणी दरम्यान उमेदवार मानसिक रुग्ण, जुना आजार, उच्च रक्तदाब, उच्च मधुमेह, उच्च ताण इत्यादी सततच्या आजाराने ग्रस्त असल्याचे निष्पन्न झाल्यास उमेदवारास अपात्र करण्यात येईल. त्याची खातरजमा करुन घटक प्रमुखांनी त्या बाबत प्रमाणित करावे.

५ शारीरिक क्षमता चाचणीची प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर उमेदवारांची गुणवत्ता यादी त्यांचे मुळ घटकानुसार http://www.mahapolice.gov.in/ या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

६ निवड प्रक्रियेत पात्र ठरलेले पोलीस अधिकारी / अंमलदारांना ते ऑनलाईन अर्ज करतेवेळी ते ज्या पदावर कार्यरत होते त्याच पदावर त्यांना प्रतिनियुक्ती देण्यात येईल.

७ गुणवत्ता यादीतील उमेदवारांची निवड तात्पुरती ( Provisional selection ) असेल, गुणवत्ता यादीमध्ये उमेदवारांच्या नावाचा समावेश झाला म्हणुन प्रतिनियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे समजण्यात येवू नये. गुणवत्ता यादीनुसार पदे भरण्याचा अधिकार विशेष पोलीस महानिरीक्षक, (व्ही.आय.पी.सुरक्षा ) विशेष सुरक्षा विभाग, मुंबई यांना आहे. त्याबाबत अंमलदारांना कोणताही दावा करण्याचा हक्क राहणार नाही.

८ विशेष सुरक्षा विभागासाठी शारीरिक क्षमता चाचणी पात्रतेनुसार गुणवत्ताक्रमाने येणा-या उमेदवारांना विशेष सुरक्षा विभागासाठी आवश्यक असलेले PSO Basic प्रशिक्षण यशस्वीरित्या उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे. सदरचे प्रशिक्षण उत्तीर्ण झालेल्या अधिकारी / अंमलदारांचाच विशेष सुरक्षा विभागामध्ये प्रतिनियुक्तीकरिता विचार करण्यात येईल.

९ PSO Basic प्रशिक्षणात अनुत्तीर्ण झाल्यास पोलीस अधिकारी / अंमलदार यांना विसुवि प्रतिनियुक्तीकरीता अपात्र ठरविले जाईल.

१० विशेष सुरक्षा विभागामध्ये जस जसे पदे रिक्त होतील त्याप्रमाणे अंमलदारांना प्रतिनियुक्ती दिली जाईल.

११ निवड प्रक्रियेत पात्र उमेदवारांना ( अंमलदारांना ) त्यांच्या मुळ घटकासाठी दर्शविण्यात आलेल्या विसुवि घटकामध्येच प्रतिनियुक्ती होईल, इतर विसुवि घटकामध्ये त्यांच्या प्रतिनियुक्तीसाठी विचार केला जाणार नाही.

१२ विशेष सुरक्षा विभागात अंमलदाराची निवड झाल्यावर त्यांचा वि.सु.वि.प्रतिनियुक्तीचा कालावधी हा ५ वर्षाचा असेल ( शारिरीक चाचणी आणि गोळीबार चाचणी उत्तीर्ण होण्याच्या अटींच्या अधीन राहुन) आणि ५ वर्षाच्या पुढे अंमलदाराला कोणत्याही परिस्थितीमध्ये मुदतवाढ मिळणार नाही.

१३ विशेष सुरक्षा विभाग अंतर्गत विहित कालावधी पुर्ण झाल्यावर कोणतीही पूर्वसुचना न देता अंमलदाराला मुळ घटकात परत पाठविण्याचे सर्वस्वी अधिकार विशेष पोलीस महानिरीक्षक (व्ही.आय.पी.सुरक्षा ) विशेष सुरक्षा विभाग, दादर, मुंबई यांना राहतील.

१४ पोलीस अधिकारी यांचेकरीता वि.सु.वि. विहित कालावधी ३ वर्षाचा असेल, कालावधी पुर्ण झाल्यावर सार्वत्रिक बदल्यामध्ये त्यांची इतरत्र बदली होणेबाबत मा.पोलीस महासंचालक, म.राज्य मुंबई कार्यालयास कळविण्यात येईल.

१५ विसुवि मध्ये कार्यकाळ पुर्ण झाल्यानंतर मुदतवाढ मिळणेकरीता कोणत्याही प्रकारचा बाह्य प्रभाव आणल्यास (संबंधित पोलीस अधिकारी / अंमलदार ) हे शिस्तभंगाच्या कार्यवाहीकरीता पात्र ठरतील. तसेच बेशिस्त वर्तन,वारंवार गैरहजर रहाणे, वारंवार रुग्णनिवेदन करणे, दिलेले कर्तव्य नाकारुन ठराविक ठिकाणीच कर्तव्य बजावण्यासाठी आग्रह धरणे अशा प्रकारच्या वर्तनाबदल विशेष सुरक्षा

विभाग येथील कालावधी पुर्ण होण्याआधी अधिका-यांच्या बदलीची शिफारस करणे व कर्मचा-यांना मुळ घटकात परत करण्याचे अधिकार विशेष पोलीस महानिरीक्षक यांना असतील त्या बद्दल कोठेही दाद मागता येणार नाही.

१६ निवड प्रक्रियेत अंशत: बदल करणे, स्थगित करणे, रद्द करणे तसेच रिक्त पदांच्या एकुण संख्येमध्ये बदल करणे याबाबतचे सर्वस्वी अधिकार विशेष पोलीस महानिरीक्षक, ( व्ही.आय.पी.सुरक्षा), विशेष सुरक्षा विभाग, दादर, मुंबई यांना राहतील.

१७ भरतीसाठी अर्ज करणा-या उमेदवाराविरुध्द कोणतीही विभागीय चौकशी/न्यायालयीन प्रकरण प्रलंबित नाही याची खातरजमा सबंधित घटक प्रमुख करतील व तसे ना हरकत प्रमाणपत्र नमुद करतील.

१८ भरती प्रक्रियेत उतीर्ण होवुन विशेष सुरक्षा विभागाचे प्रशिक्षण पुर्ण केल्यावर विशेष सुरक्षा विभागात संबधित घटकात जशा जागा उपलब्ध होतात त्या प्रमाणे विसुवि मध्ये हजर होण्याकरीता संबंधित उमेदवार व घटक प्रमुखांना कळविले जाईल त्या वेळी नेमणूक रद्द करण्याविषयी केलेले विनंती अर्ज ( भरती नंतर निर्माण झालेल्या गंभीर स्वरुपाच्या शारिरीक/मानसिक व्याधी वगळता ) विचारात घेतले जाणार नाहीत.

१९ उमेदवरांनी ज्या मुळ घटकातुन अर्ज केलेला आहे त्या घटकातनुच त्यांची निवड करण्यात येईल. जर एखादा उमेदवार निवड झाल्यानंतर त्यांचे मुळ घटकातुन इतर घटकात आंतरजिल्हा बदलीने गेला असेल तर त्याला जिल्हा बदली घटकातुन घेण्यात येणार नाही.

२० महाराष्ट्र शासन,गृह विभाग,शासन निर्णय क्र.पीएमएन-०८२१/प्र.क्र.५३३/पोल ५ ब/ दिनांक २५/०२/२०२२ च्या शासन निर्णयान्वये राज्य राखीव पोलीस बल गट वगळून आयुक्तालय/जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवरील पोलीस नाईक पद मृत करण्यात आल्याने आयुक्तालय/जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवरील पोलीस नाईक यांची रिक्त पदे पोलीस हवालदार व पोलीस शिपाई पदामध्ये वर्ग करण्यात आलेली आहेत.

**विशेष सुरक्षा विभागातील पोलीस हवालदार / पोलीस नाईक / पोलीस शिपाई यांची रिक्त पदांची माहिती खालील प्रमाणे आहे :-**

| विसुवि मुंबई घटक | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र | मुळ घटक | पो.हवा. | पो.ना. | पो.शि. |
| १ | मुंबई शहर | ५० | ० | ८५ |
| २ | ठाणे शहर | ६ | ० | ५ |
| ३ | नवी मुंबई | ३ | ० | ८ |
| ४ | ठाणे ग्रामीण | ३ | ० | ५ |
| ५ | लोहमार्ग मुंबई | १२ | ० | ११ |
| ६ | मीरा भाईंदर | ८ | ० | ७ |
| ७ | पालघर | ० | ० | १ |
| ८ | रायगड | ० | ० | ३ |
| ९ | रत्नागिरी | १ | ० | ० |
| १० | सिंधुदुर्ग | ० | ० | ० |
| ११ | रारापोबल गट क्र.८मुंबई | ० | २९ | ० |
| १२ | रारापोबल गट क्र.११ नवी मुंबई | ९ | १ | ४२ |
| | | | | |

| विसुवि पुणे घटक | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र | मुळ घटक | पो.हवा. | पो.ना. | पो.शि. |
| १ | पुणे शहर | ० | ० | ३३ |
| २ | पुणेग्रामीण | १ | ० | ५ |
| ३ | पिंपरीचिंचवड | २ | ० | ५ |
| ४ | लोहमार्ग पुणे | १ | ० | ३ |
| ५ | सोलापुर शहर | १ | ० | ० |
| ६ | कोल्हापूर | ० | ० | ० |
| ७ | सांगली | १ | ० | ० |
| ८ | सातारा | ० | ० | १ |
| ९ | सोलापुर ग्रामीण | ० | ० | ० |
| १० | रारापोबल गट क्र.१ पुणे | २ | १ | १ |
| ११ | रारापोबल गट क्र.२ पुणे | ० | ० | ३ |
| १२ | रारापोबल गट क्र.५ दौंड | २ | ० | ० |
| १३ | रारापोबल गट क्र.७ दौंड | १ | ० | ० |
| १४ | रारापोबल गट क्र.१० सोलापूर | १ | ० | १ |
| | | | | |

| विसुवि नाशिक घटक | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र | मुळ घटक | पो.हवा. | पो.ना. | पो.शि. |
| १ | नाशिक शहर | २ | ० | ६ |
| २ | नाशिक ग्रामीण | ० | ० | ३ |
| ३ | अहमदनगर | १ | ० | १ |
| ४ | धुळे | १ | ० | ० |
| ५ | नंदुरबार | ० | ० | ० |
| ६ | रारापोबल गट क्र.६ धुळे | ० | २ | ० |
| | | | | |

| विसुवि जळगाव घटक | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र | मुळ घटक | पो.हवा. | पो.ना. | पो.शि. |
| १ | जळगांव | ० | ० | ६ |
| २ | अकोला | ० | ० | ० |
| ३ | बुलढाणा | १ | ० | १ |
| ४ | रारापोबल गट क्र.६ धुळे | ० | १ | ० |
| | | | | |

| विसुवि छ.संभाजीनगर घटक | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र | मुळ घटक | पो.हवा. | पो.ना. | पो.शि. |
| १ | छ.संभाजीनगर शहर | ४ | ० | ० |
| २ | छ.संभाजीनगर ग्रामीण | १ | ० | १ |
| ३ | उस्मानाबाद | ० | ० | ० |
| ४ | बीड | ० | ० | १ |
| ५ | जालना | १ | ० | १ |
| ६ | रारापोबल गट क्र.३ जालना | १ | ० | ० |
| | | | | |

| विसुवि नांदेड घटक | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र | मुळ घटक | पो.हवा. | पो.ना. | पो.शि. |
| १ | नांदेड | ० | ० | १ |
| २ | हिंगोली | ० | ० | १ |
| ३ | परभणी | ० | ० | १ |
| ४ | लातुर | ० | ० | १ |
| ५ | रारापोबल गट क्र.१२ हिंगोली | ० | ० | ० |
| | | | | |

| विसुवि नागपूर घटक | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र | मुळ घटक | पो.हवा. | पो.ना. | पो.शि. |
| १ | नागपुर शहर | ५ | ० | ५ |
| २ | चद्रपुर | १ | ० | १ |
| ३ | गोंदिया | १ | ० | १ |
| ४ | भंडारा | १ | ० | १ |
| ५ | अमरावती ग्रामीण | १ | ० | ० |
| ६ | वर्धा | १ | ० | ० |
| ७ | यवतमाळ | १ | ० | ० |
| ८ | वाशिम | ० | ० | ० |
| ९ | नागपुर ग्रामीण | २ | ० | ५ |
| १० | अमरावती शहर | १ | ० | ० |
| ११ | रारापोबल गट क्र.४नागपूर | १ | ० | १ |
| १२ | रारापोबल गट क्र.९ अमरावती | १ | २ | ० |
| | | | | |

| विसुवि अहेरी घटक | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र | मुळ घटक | पो.हवा. | पो.ना. | पो.शि. |
| १ | गडचिरोली | २ | ० | ३ |
| २ | रारापोबल गट क्र.१३ गडचिरोली | ० | ० | १ |
| | | | | |

**विशेष सुरक्षा विभागातील नि:शस्त्र पोलीस निरीक्षक / नि:शस्त्र सहा. पोलीस निरीक्षक / पोलीस उप निरीक्षक यांची रिक्त पदांची माहीती खालीलप्रमाणे आहे :-**

| पद | रिक्त पदे |
|---|---|
| नि:शस्त्र पोलीस निरीक्षक | १९ |
| नि:शस्त्र सहा.पोलीस निरीक्षक | ३४ |
| नि:शस्त्र पोलीस उप निरीक्षक | ३५७ |
| **एकुण** | **४१०** |

अर्जदारांनी सादर केलेल्या ऑनलाईन अर्जांच्या छाननीनंतर पात्र ठरलेल्या अर्जदारांसाठी शारीरिक क्षमता चाचणीकरीता निश्चित करण्यात आलेली तारीख सर्व घटकांना या कार्यालयाव्दारे परिपत्रक जारी करुन कळविण्यात येईल.

| | |
|---|---|
| अर्ज भरुन सादर करण्याची तारीख: | दि.०४/०६/२०२५ ते ०३/०७ २०२५ ( रात्रौ १२.०० पर्यंत ) |
| अर्जदारांकरीता वयोमर्यादा: | संदर्भाधीन शासन निर्णयामध्ये नमूद वयोमर्यादा दि.३/०७/२०२५ रोजी पर्यंत ग्राहय धरण्यात येईल. |

आयुक्त,
राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,
मुंबई यांचेकरीता